**नियमित दिवाणी दावा क्र.१११/२०१९**

## निशाणी क्र.११४ वरील आदेश

वादी क्र.१ तर्फे प्रस्तुतचा अर्ज हा त्यांचे मृत्यू पश्चात त्यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे थोडक्यात कथन की, वादी यांनी सदरचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला असून वादी नं. १ ही दिनांक २८.०३.२०२० रोजी मयत झालेली आहे. परंतु, कोविड–१९ मुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेणेचा अर्ज ११ दिवसाचे विलंबाने म्हणजेच दिनांक ०९.०७.२०२० रोजी दाखल केलेला आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक ०९.०७.२०२० रोजीचे अर्जास मुदतीच्या कायद्याची बाधा येत नाही. वादी यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ न झाल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसार होणार आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. याउलट प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे देवून हरकत नोंदवली की, सदर अर्ज हा आदेश २२ प्रमाणे मुदतीत नसून सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजूंचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, सदरचा अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कारण अर्जामध्ये नमूद केलेले आहे. सदरचे कारण हे योग्य असल्यामुळे विलंब माफ न केल्यास वादी यांचे कधिही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायाचे तत्वानुसार सदर विलंब माफीचा अर्ज मंजूर करणे

न्यायोचित होईल. परिणामी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. तसेच, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

MADHAVI RAJESH DHANORKAR

Digitally signed by MADHAVI RAJESH DHANORKAR
Date: 2022.04.19 11:17:12 +0530

(एम.आर.धानोरकर)

दि.१८/०४/२०२२. सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
माळशिरस.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : S.M.Algundgi, Grade-II |
| (b) | Court | : Jt. Civil Court Sr. Divn., Malshiras. |
| (c) | Judgment signed by P.O. on | : 18.04.2022. |
| (d) | Judgment uploaded on | : 19.04.2022. |